# नागपूर हिवाळी अधिवेशन २०१३

## एफडीए आयुक्तांची चौकशी करावी
## - आमदार प्रशांत ठाकूर यांची अधिवेशनात मागणी

नागपूर (प्रतिनिधी) अन्न आणि औषध प्रशासनाकडून राज्यातील औधषविकेत्यांवर नाहक कारवाई होत असून यासंदर्भात मुख्यमंत्री यांनी विशेष लक्ष घालून एफडीए आयुक्तांची चौकशी करावी, अशी मागणी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करून केली.

राज्यभरातील औषधविकेत्यांवर अन्न आणि औषध प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाईचा निषेध म्हणून केमिस्टनी ११ नोव्हेंबर २०१३ रोजी संपावर जाण्याचा निर्णय घेतला. अन्न आणि औषध प्रशासनाकडून औषधांच्या दुकानांवरील कारवाई गेल्या काही दिवसांमध्ये तीव्र करण्यात आली. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे विकणाऱ्या तसेच फार्मासिस्ट असलेल्या औषध दुकानांवर कारवाई केली जात असल्याने मधुमेह, अस्थमा, उच्च दाबासारख्या कायमस्वरूपी आजारांच्या औषधांसाठी प्रत्येकवेळी नविन प्रिस्क्रिप्शन आणणे रूग्णांना आणणे शक्य होत नाही. एफडीएचे अधिकारी दुकान बंद करण्याच्या व विकी परवाना रद्द करण्याच्या हेतूनेच औषधे विकेत्यांवर कार्यवाही करीत आहेत. तसेच कायद्यात तरतूद नसतानाही तपासणी दरम्यान त्वरीत खरेदी-विकी बंद करण्याचे आदेश लादत आहेत.

अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी छोटया कारणांसाठी टोकाची भुमिका घेऊन ३0 ते ३६५ दिवसांसाठी औषधे विकेत्यांचे परवाने निलंबित करीत आहेत. त्याचबरोबर अनावश्यक कारणे व सबब शोधून विकेत्यांवर एफआयआर दाखल करून तपासणी दरम्यान धमक्या देवून हे अधिकारी आपली दहशत निर्माण करीत आहेत. एफडीएच्या या कारवाई विरोधात द रिटेल ॲण्ड डिस्पिसिंग केमिस्ट असोसिएशन आणि द फार्मास्यटिकल होलसेलर्स असोसिएशन यांनी एकत्रितरित्या एक दिवसाचा संप पुकारला होता. अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांमुळे औषध विकेत्यांना विनाकारण त्रास होत असून अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या अन्याय दूर करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे औचित्याचा मुद्याव्दारे सभागृहात केली.